## -: प्रेसनोट दिनांक - २७/५/२०२० :-

**आरोपी खाजगी इसम विशाल कृष्णात हंचनाळे रा.नंदगाव ता.करवीर जि.कोल्हापूर यांनी लाचेची मागणी केलेने त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल केले बाबत**

ooo

यातील तक्रारदार यांचेविरुध्द इस्पुर्ली पोलीस ठाणे, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल आहे. इस्पुर्ली पोलीस ठाणेस तत्कालीन प्रभारी अधिकारी म्हणुन सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड असुन तक्रारदार यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार परसु पाटील हे करीत आहेत. तक्रारदार यांचेविरुध्द गुन्हा दाखल झाल्यानंतर इस्पुर्ली पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक रमेश गायकवाड यांचा मित्र विशाल हंचनाळे, रा.नंदगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचेशी संपर्क करुन सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड तपास कामात मदत करतील,गुन्हयात अटक करणार नाहीत त्यासाठी गायकवाड साहेबांना ५०,०००/- रुपये दयावे लागतील असे सांगुन सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड यांचेसाठी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार शहापुरे यांनी विशाल हंचनाळे व इस्पुर्ली पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड यांचे विरुध्द दिनांक २७.४.२०२० रोजी तक्रारी अर्ज दिला होता.

यातील फिर्यादी/तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी प्रमाणे शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष दिनांक २७.४.२०२० रोजी खाजगी इसम विशाल हंचनाळे यांचेकडे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता विशाल हंचनाळे यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचे तपासात सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड मदत करतील असे वगैरे सांगुन सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड यांचेसाठी प्रथम ५०,०००/- रुपये व नंतर तडजोडीअंती ३०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी विशाल हंचनाळे यांना सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड यांचेशी भेट घालुन देणेची विनंती केली असता विशाल हंचनाळे यांनी गायकवाड साहेबांशी बोलुन घेवुन सायंकाळी फोन करुन सांगतो असे सांगीतलेचे निष्पन्न झाले.परंतु,त्या दिवशी विशाल हंचनाळे यांनी तक्रारदार यांना फोन केला नाही.

दिनांक २८.४.२०२० रोजी कारवाई आयोजित करणेत आली परंतु त्या दिवशी विशाल हंचनाळे यांनी तक्रारदार यांना फोन केला नाही.म्हणुन तक्रारदार यांनी हंचनाळे यांना फोन केला असता त्यांचा मोबाईल फोन स्विच ऑफ असलेचे समजुन आले.दिनांक २९.४.२०२० रोजी कारवाई आयोजित करणेत आली.परंतु,त्या दिवशी सुध्दा विशाल हंचनाळे यांनी तक्रारदार यांना फोन केला नाही.त्या दिवशी सुध्दा हंचनाळे यांचा मोबाईल फोन बंद असलेचे समजुन आलेने सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी करणेत आली.त्या पडताळणी मध्ये तक्रारदार यांची इस्पुर्ली पोलीस ठाणे येथे सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड यांची भेट झाली त्यावेळी सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड यांनी तक्रारदार यांना लॉकडाऊन संपले नंतर पोलीस ठाणेत येणेस सांगीतले.

त्यानंतर विशाल हंचनाळे यांनी तक्रारदार यांना सांगीतले प्रमाणे त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारलेली नाही.परंतु,खाजगी इसम विशाल कृष्णात हंचनाळे रा.नंदगाव ता.करवीर यांनी तक्रारदार यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचे तपासात इस्पुर्ली पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड मदत करतील असे सांगुन सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड यांचेसाठी ५०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०,०००/- रुपये लाचेची मागणी केलेली असल्याने सदर घटनेबाबत तक्रारदार अंजिक्य शिवाजी शहापूरे रा.दिंडनेर्ली ता.करवीर जि.कोल्हापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून खाजगी इसम विशाल कृष्णात हंचनाळे रा.नंदगाव ता.करवीर यांचेविरुध्द इस्पुर्ली पोलीस ठाणे जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करुन पुढील तपास आम्ही स्वत:करीत आहोत.

सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त / पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती चव्हाण अपर पोलीस उप आयुक्त / अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो पुणे व श्री.आदिनाथ बुधवंत पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक श्री.युवराज सरनोबत, सहायक फौजदार शाम बुचडे, पोलीस नाईक शरद पोरे व पोलीस कॉन्स्टेबल रुपेश माने,मयुर देसाई ,चालक पोहेकॉ सुरज अपराध,पोहेकॉ विष्णु गुरव अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे
दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३

३) श्री.आदिनाथ बुधवंत , पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर दुरध्वनी कमांक ०२३१-२५४०९८९

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३